**पुणे महानगरपालिका.**

जाहिरात प्रकटन,

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदासाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ क्र | पदनाम | वेतन श्रेणी रुपये | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उपअभियंता तथा नियोजन अधिकारी (वर्ग-ब) | रुपये ८००० ते १३५०० | बी.ई. (सिव्हिल)<br>महापालिकेशी संबंधीत योजनाबाबतच्या योजनांचा ५ वर्षांचा कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | १ | सर्वसाधारण | **महापालिका आयुक्त कार्यालय** | |

**अटी:-**

१) **<u>वयोमर्यादा</u>** :-

**(अ)** जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

**(ब)** माजी सैनिक व अपंग यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**(क)** स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू यांना ५ वर्ष शिथीलक्षम व जनगणना कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**(ड)** पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागु होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

**३) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.**

४) वरील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

५) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील.

६) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता-गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**७) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.**

८) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

९) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

१०) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

११) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१२) अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१३) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्त समाप्त करण्यात येईल.

१४) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१५) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे.त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.परिक्षेचा प्रकार,पदांची संख्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे,परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे,अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका हे स्वत:कडे राखून ठेवीत आहे.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

**१६) खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु. ५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली १) मा.उप आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर, पुणे ४, २) मा.उप आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत, पुणे १. ३) मा.उप आयुक्त क्र.३. - टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय, ९९०, शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३०.,४) मा.उप आयुक्त क्र.४-टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९० शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३० येथे दि. १३ /११/२००९ ते दि.२० /११/२००९ अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.२१/११/२००९ दुपारी ४.०० पर्यंत स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

**सही/-**

**महेश झगडे**

**महापालिका आयुक्त**

**पुणे महानगरपालिका.**